**स्पष्टीकरण**

जिल्हा परिषद अहमदनगर चे संकेस्थळावर दिनांक २०-१-२०२४ रोजी विस्तार अधिकारी (कृषी) व विस्तार अधिकारी (सांखिकी) या संवर्गाचे निकाल प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर निकालामध्ये आयबीपीएस कंपनीचा लोगो डार्क स्वरुपात दिसुन येत असलेने काही उमेदवारांचे पेपर १ व २ चे मार्क दिसुन येत नाही अशा स्वरुपाचे तक्रारी प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने खालील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. आयबीपीएस कंपनीकडुन परिक्षा झालेनंतर दिनांक १९-१-२०२४ रोजी प्रवर्ग निहाय कट ऑफ, प्रवर्ग निहाय परिक्षेसाठी बसलेले व पात्र उमेदवारांचा तक्ता व एकुण पात्र उमेदवारांचे प्राप्त गुण यादी अशा पासवर्ड प्रोटेक्टेडेड पीडीएफ यादया प्राप्त झालेल्या आहेत. सदर यादया प्राप्त झालेनंतर सर्व पीडीएफ एकत्रिकरणासाठी करुन प्रसिध्द करणे आवश्यक असलेने एकत्रिकरण करण्यात आल्यामुळे सदरचा लोगो हा ठळक स्वरुपात दिसुन येत होता. यामध्ये काही उमेदवारांचे पेपर १ व पेपर २ चे गुण दिसुन येत नसलेने, हि बाब निदर्शनास येताच या पीडीएफ पुन्हा एकत्रित करण्यात आलेल्या असुन सदरच्या यादया या जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. आयबीपीएस कंपनी कडुन प्राप्त होणा-या यादया या पासवर्ड प्रोटेकक्टेड असलेने यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येत नाही. तरी उमेदवाराना आवाहन करण्यात येत कि, आपण कोणत्याही प्रकारे गैरसमज पसरवू नये. याबाबत कोणत्याही प्रकाराचा गैरसमज अथवा अपप्रचार केलेस संबधीता विरुध्द उचित कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.